१. भारतमाता

● **ऐका. म्हणा. वाचा.**



प्रियतम अमुची भारतमाता
आम्ही सारी तिची मुले,
रंग वेगळे गंध वेगळे
तरी येथली सर्व फुले ।।धृ।।

प्रिय आम्हाला येथील माती
प्रिय हे पाणी झुळझुळते,
प्रियकर ही डुलणारी शेते
प्रिय हे वारे सळसळते ।।१।।

प्रियतम आमुचा धवल हिमालय
बघे भिडाया जो गगना,
प्रियतम अमुचे सह्यविंध्य हे
प्रियतम या गंगा जमुना ।।२।।

मानव सारे समान असती
शिकवण ही जगतास दिली,
या मातेची मुले सद्‌गुणी
सर्व जगाला प्रिय झाली ।।३।।

प्रियतम अमुची भारतमाता
वंदन आम्ही तिला करू,
या मातेची मुले लाडकी
सदा तिचा ध्वज उंच धरू ।।४।।

– शांता शेळके

शिक्षकांसाठी : गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. विद्यार्थ्यांना मागून म्हणायला सांगावे. गाणी व समूहगीतांच्या ध्वनिफिती विद्यार्थ्यांना ऐकवाव्या.